राज्य योजनासन २०२६-२७

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या योजनेतर्गत निधीवितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी- ०५.२६/प्र.क्र.१९२/फ-१

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक :- १२ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :- असं/कक्ष- १ सी/ प्र.क्र. ०९/४६/२०२६-२७, दिनांक १५.०५.२०२६.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :- असं/कक्ष- १ सी/ प्र.क्र. ०९/५७८/२०२६-२७, दिनांक :- ०४.०८.२०२६.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्रमांक :- असं/कक्ष- १ सी/ प्र.क्र. ०९/१३६/२०२६-२७, दिनांक :- ०७.०८.२०२६.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ आर्थिक वर्षाकरिता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या लेखाशिर्षाअंतर्गत एकूण रु. १००००.०० लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ व २ चे परिपत्रकान्वये सन २०२६-२७ मध्ये निधी वितरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्रमांक ३ ते ५ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर व यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या योजनेतंर्गत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केले असून त्याअनुषंगाने शासन पुढील निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक १ व २ चे परिपत्रक विचारात घेता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ३ ते ५ च्या पत्रान्वये केलेली निधीची मागणी लक्षात घेऊन डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या लेखाशिर्षातील **रु. ४००.०० लक्ष** इतका निधी खालील अटी व शर्तीचे अधिन राहून सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०२६-२७ मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२, पर्यावरणीय वनिकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवांचे संरक्षण, (००) (१८) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११)अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

II. योजनांतर्गत प्रस्तावित कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

III. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेत विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

IV. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

V. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

VI. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ चे काटेकोर पालन करावे.

२. सदरशासननिर्णय वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक :- ५५३/२०२६/व्यय-१०, दिनांक १०.०७.२०२६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१२११२५०२७३४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIDHAR VIKRAM DESHMUKH

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=D3DD41251A6E229D40D43D90520B8D2A921AE59C8013644628B65C38D28868D8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=912CC46938BC6D9CF9A14E38D8B09ED7F8FD6E5EE2A4A245C1C55A32E6315D48, cn=SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.08.12 12:59:45 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अ.प्र.मु.व.स.(वन्यजीव),पश्चिम मुंबई / पूर्व नागपूर.
५. क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व)
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),/वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव)/ उप वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) (सर्व)
७. विभागीय वन अधिकारी (वन्यजीव/प्रादेशिक) (सर्व).
८. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
९. ब-१,फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी- ०५.२६/प्र.क्र.१९२/फ-१,
दिनांक :- १२ ऑगस्ट, २०२६ सोबतचे विवरण पत्र.

(रु. लाखात)

अ. क्र.	वन विभाग	प्रस्तावाची रक्कम	वितरीत निधी				
			०२- मजुरी	२१- पुरवठा व सामग्री	२७- लहान बांधकामे	५०- इतर खर्च	एकूण
१	उप वनसंरक्षक (प्रा.) नागपूर	७२५.००	५५.००	६०.००	३०.००	३०.००	१७५.००
२	उप वनसंरक्षक (प्रा.) भंडारा	२२५.००	२२.५०	६७.५०	११२.५०	२२.५०	२२५.००
	एकूण	९५०.००	७७.५०	१२७.५०	१४२.५०	५२.५०	४००.००

****